www.epunyanagari.com
Toll Free 9773927928
# पुण्य नगरी
सातारा ◆ शुक्रवार, ५ फेब्रुवारी २०२१ । वर्ष : १७ । अंक : ३०४ । पाने १०+४ =१४ ★ किंमत : ₹ ५

# शिवकाळ म्हणजेच प्रेरणा देणारा दीपस्तंभ

प्रा. डॉ. सुरेश चव्हाण

**सातारा / प्रतिनिधी**

३ फेब्रुवारी २०२१ रोजी छत्रपती शिवाजी कॉलेजमधील इतिहास विभागाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांर्गत (रुसा) विशेष व्याख्यान आयोजित केले होते. या प्रसंगी डॉ. सुरेश चव्हाण यांनी आपल्या व्याख्यानात शिवकाळातील स्त्रिया, तरुण, राजकारण, समाज, भ्रष्टाचार आणि अन्य मुद्यांना हात घातला.

शिवकाळातील किशोरवयीन मुले समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो याची जाणीव ठेवत होती. आजची मुले आपल्या समाजाबद्दल सोडा आई वडिलांबद्दल अपशब्द वापरून बोलतात. शिवकाळातील मुले आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जगत होती व मरत होती. आज मात्र तरूण आपल्याच स्वप्नासाठी जगतात. आई वडिलांचा विचारच करत नाहीत. शिवकाळात वृद्धाश्रम नव्हते. आज मात्र, वृद्धाश्रम ओसंडून वाहत आहेत. शिवकालीन ग्रामीण समाज स्वयंपूर्ण होता. आजचा समाज मात्र परावलंबी बनला आहे. आजच्या माणसांनी अनावश्यक गरजा वाढविल्या आहेत. शिवकालातील तरुण मुले शक्तिसाधना करीत होते, आजची मुले मात्र यापासून दूर व व्यसनाधीन आहेत. शिवकाळातील राजकारण हे समाजहितासाठी होते. समाज व शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवून राजकारण होते. आज देशाने शिवकालातील विचारांचा अवलंब केला तर भारत हा निश्चितच जागतिक महासत्ता बनेल असा ठाम विश्वास या प्रसंगी त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षपद इतिहास विभागातील प्रा, मनोहर निकम यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय इतिहास विभाग प्रमुख डॉ. धनाजी बाबुराव मासाळ यांनी करून दिला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे सचिव मा. डॉ. विठ्ठल शिवणकर यांचे मार्गदर्शन लाभले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.